**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मच्छिंद्र यशवंत पाटील
मु.पो.व ता.आटपाडी,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०५/सांगली |
| २ | सुनावणीचा तारीख | दि. २६/०५/२०१० |
| ३ | उपस्थिती<br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**<br>सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,<br>सांगली श्री.जे.डब्लू.कडू यांचे प्रतिनिधी श्री.सु.म.काटे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**<br>सहकारी संस्था, सांगली<br>यांचे प्रतिनिधी श्री.जे.पी. शिंदे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा, जि.सांगली | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/११/२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८/१२/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/१२/२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४/०१/२००९ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जुलै २००७ पासून बँकेच्या माडगुळे शाखेतील नॉन सॅलरी अकांऊट मध्ये कोणी व किती वेळा चेकने पैसे काढले त्या चेकच्या छायाप्रती | |

## विवेचन

' सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा सांगली यांनी मला आवश्यक ती माहिती दिली आहे. तरी कृपया अपील निकाली काढावे,' असे अपीलकर्ता श्री. मच्छिंद्र यशवंत पाटील यांचे दि.२०/०५/२०१० चे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.सु.म.काटे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. ज्ञानेश्वर महादेव पाटील
मु. आहेरगाव, पो.आकुंबे, ता.माढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन,
सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया
संघ, सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ३१.३.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक,<br>सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे श्री. आर.के.लाखे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.३१.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती सन १९८१ पासूनची असल्यामुळे संकलित करून देता येणार नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ, सोलापूर यांनी विहित मुदतीत कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेनुसार मुद्दा क्र.२,३ व ४ ची माहिती नको असल्याचे अपीलकर्त्याने सांगितले. मुद्दा क्र.५ ची काही माहिती देण्यात आली असून मुद्दा क्र.१ सह ऊर्वरित माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे श्री. आर. के. लाखे यांनी केले. अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडील अपिलात नमूद केलेली कारणमीमांसा न देणे, लेखी प्रपत्र सादर न करणे इत्यादी बाबतची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखलयोग्य विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बाबुराव नारायण काटे — अपीलकर्ता
ह.भ.प. शांतीराथ महाराज मठामागे,
लिंगरोड, पंढरपूर, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
उजनी कालवा विभाग, क्र.७, पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ३१.३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,<br>भीमा कालवा मंडळ, सोलापूर श्री. र.प्र.लांडेकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>उजनी कालवा विभाग, क्र.७, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. नि. रे. कारीमुंगी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभयतांमध्ये एकमत न झाल्याने दि. ३१.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. बाबुराव नारायण काटे यांनी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. विहित मुदतीत त्यांना उत्तर पाठविले. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग, क्र.७, पंढरपूर या कार्यालयात ते कार्यरत होते. तो विभाग बंद झालेला असून त्यांची बदली झाल्यामुळे त्या संदर्भातील विविध स्वरूपाचे मुद्दे उपस्थित करून 'माहिती'ची मागणी व पत्रव्यवहार ते करीत असतात. अपील क्र. ११८ व २२८ मध्ये अशा स्वरूपाची मागणी त्यांनी केली असून आयोगाने त्यांची अपिले फेटाळली आहेत. केवळ त्रास देण्याच्या हेतूने ते अशा स्वरूपाचे अर्ज करतात, तरीही 'माहिती'चे अवलोकन श्री. काटे यांना करू द्यावे व त्यानुसार त्यांना हवी असलेली माहिती द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांनी दिले. त्यानुसार त्यांना सर्व माहिती देण्यात आली असून त्याची पोहच त्यांनी दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. नि. रे. कारीमुंगी व अपिलीय प्राधिकारी श्री. र. प्र. लांडेकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हनुमंत पांडुरंग पाटील
मु.कन्हेरगाव, पो.अकोले (खुर्द),
ता.माढा, जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,**
नवीन प्रशासकीय इमारत, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/१२/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय मान्यतेची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. हनुमंत पांडुरंग पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने तसेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले नसल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 21 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. महावीर सुरगोंडा पाटील
मु.पो.ब्रम्हनाळ, ता.पलूस,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,**
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४२/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/०७/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/११/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि. २९/०६/२००८ रोजी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भातील माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.५/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. महावीर सुरगोंडा पाटील यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध असणारी माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर, यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. माहिती-मागणी अर्ज हा श्रीमती रोहिणी महावीर पाटील

यांच्या नावे असून प्रथम व आयोगाकडील अपिलामध्ये अर्जदार श्रीमती रोहिणी पाटील यांच्या सह श्री. महावीर सुरगोंडा पाटील यांच्या नावाचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरची बाब नियमानुसार योग्य नाही. पोलिसांवर गुन्हा नोंदवावा व बदनामीकारक बातमीचा खुलासा द्यावा, अशी मागणी अपीलकर्त्याने आयोगाकडील अपिलामध्ये केली असून सदरची बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अतंर्गत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 24 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव
२०० फुटी रोड, माळी वस्ती,
यशवंतनगर, ता.मिरज,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

२) **जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
नगररचना विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५५/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/१०/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३/०१/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सांगली महानगरपालिकेच्या आरक्षित जागा, त्यांचे सी.टी. सर्व्हे नंबर इ. एकूण ७ मुद्दयांची विस्तृत माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. रामचंद्र नारायण जाधव

यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने मुदतीत माहिती देण्यात आलेली आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, श्री.एस.के.राऊत व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका श्री.वाय.बी.माळी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच अपीलकर्त्यास दि.८/१०/२००८ रोजी माहितीचे अवलोकन करण्यासाठी बोलविण्यात आले असता अपीलकर्ता श्री.जाधव हे कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दि.१५/०४/२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 29 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव
१०० फुटी रोड, माळी वस्ती,
यशवंतनगर, ता.मिरज,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक,**
सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**२) जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,**
सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५८/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/११/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७/११/२००८, १३/०१/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/१२/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७/०१/२००९, ३/०१/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बालगंधर्व नाटयगृह मिरज हे केव्हापासून सुरु झाले, बांधकामासाठीचा खर्च किती, ठेकेदारांची संख्या, त्यांची नावे, वर्क ऑर्डर, तदनुषंगीक ८ मुद्दयांची विस्तृत माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. रामचंद्र नारायण जाधव यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जान्वये मुदतीत माहिती दिली असल्याचे,' जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका, श्री. एस.के. राऊत व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका, श्री.एस.व्ही.पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 29 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी हणमंत ढवळे
मु.पो.वडगाव रासाई, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी हणमंत ढवळे
मु.पो.वडगाव रासाई, ता.शिरूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे श्री.आर.के.शेळके

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.४.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.५.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.६.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.६.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या बागेचे नुकसान करणाऱ्या व्यक्तीविरूध्द तहसीलदारांकडे आपण केलेल्या तक्रारीवर तहसीलदारांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्याबाबत मागितलेली माहिती योग्य प्रकारे न देता आपल्यावर अन्याय केला. प्रथम अपिलाच्या वेळी एका कागदावर आपली सही घेऊन अपीलकर्त्याची काहीही तक्रार नसल्याचा शेरा त्यांनीच लिहिला अशा अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी हणमंत ढवळे यांनी केली.

श्री.ढवळे यांनी तक्रार करणारे दोन अर्ज दिले. ते पोलीस ठाण्याकडे पाठविले. तसे त्यांना कळविले. पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती श्री.ढवळे यांना देण्याबाबतही पोलीस निरीक्षक, शिरूर पोलीस ठाणे यांना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, शिरूर श्री.आर.के.शेळके यांनी केले.

अपीलकर्त्यास पाठविलेल्या पत्राची छायाप्रत व त्याची नोंद असलेल्या जावक बारनिशीची प्रत सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, शिरूर यांनी दि.१७.४.२०१० च्या पत्रान्वये पूर्तता केली. ती पाहता अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, शिरूर यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. मात्र पोलीस निरीक्षक, शिरूर यांनी अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, शिरूर यांनी दि.१६,५,२००९ च्या पत्रान्वये पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, शिरूर यांच्याकडे पाठविलेल्या अपीलकर्ता श्री.शिवाजी हणमंत ढवळे यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती पोलीस निरीक्षक, शिरूर पोलीस ठाणे यांनी दि. १.६.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास देऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
20 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रशांत कमलाकर डोलारे
१४५/अ, भारतरत्न इंदिरानगर, एमआयडीसी रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
१२४, सिध्देश्वर पेठ, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
१२४, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रशांत कमलाकर डोलारे
१४५/अ, भारतरत्न इंदिरानगर, एमआयडीसी रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
१२४, सिध्देश्वर पेठ, सोलापूर प्रतिनिधी डॉ.आय.पी.नदाफ

**जन माहिती अधिकारी** तथा अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
१२४, सिध्देश्वर पेठ, सोलापूर डॉ.आय.पी.नदाफ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.२.२००८ व ३.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

'मागितलेली माहिती मिळाली असून कसलीही अडचण / तक्रार नाही. अपील निकाली काढावे,' असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.प्रशांत कमलाकर डोलारे यांनी सुनावणीच्या वळी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हरी आप्पा प्रक्षाळे
मु.पो.अनिलनगर, म्हसोबा मंदिरासमोर, वीटभट्टीजवळ,
पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हरी आप्पा प्रक्षाळे
मु.पो.अनिलनगर, म्हसोबा मंदिरासमोर, वीटभट्टीजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर श्री.एस.एस.डोंगरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर श्री.एस.एस.डोंगरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.१२.२००८ व १६.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१.२००८ व १६.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५.५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर यांना वारंवार स्मरण देऊनही कोणतीही माहिती दिली नाही. पत्रव्यवहारावरील तारखा खोट्या व मजकूर चुकीचा आहे. मूळ अर्जानंतर चार महिन्यांनी व तेही आपण दारिद्र्यरेषेखाली असतानाही शुल्क भरण्यास कळविले. आवक-जावक लिपिकानी आपला अर्ज दाखल करून घेतला नाही, म्हणून कार्यालयाच्या भिंतीवर अर्ज डकवून त्याचे छायाचित्र घेऊन त्याच वेळी दोन पंचासमक्ष पंचनामाही केला, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.हरी आप्पा प्रक्षाळे यांनी केले.

अपीलकर्ता श्री.हरी आप्पा प्रक्षाळे यांनी दि.६.१२.२००७ व दि.१६.३.२००८ अशा दोन अर्जांद्वारे विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. माहितीला विलंब लागेल, हे त्यांना विहित मुदतीत कळविले होते. माहिती तयार झाल्यावर त्यांना तसे पत्र पाठविले. माहिती व्यक्तिशः नेणार असल्याचे त्यांनी नमूद केले असल्यामुळे टपालाने माहिती पाठविली नाही. दुसऱ्या अर्जाबाबतची माहिती पंढरपूर विभागाकडील होती. या विभागाशी संपर्क साधून माहिती घेण्याबाबत त्यांना व माहिती देण्याबाबत उपविभागास कळविले. उपविभागाने माहिती तयार करून देऊ केली असता श्री.प्रक्षाळे यांनी स्वीकारली नाही. तसे त्याच वेळी लेखी कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर श्री.एस.एस.डोंगरे यांनी केले.

संबंधित पत्रव्यवहाराच्या जावक बारनिशीतील नोंदीची व पाठविलेल्या पत्राची प्रत आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर श्री.एस.एस.डोंगरे यांनी दि.७.४.२०१० च्या पत्रान्वये संबंधित प्रती सादर केल्या, त्या पाहता त्यांचे प्रतिपादन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दगडू पंढरीनाथ जाधव
उपळाई रोड, श्रीकृष्ण कॉलनी,
धान्य गोडावून मागे, बार्शी, जि. सोलापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर .. उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ३१.३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. दगडू पंढरीनाथ जाधव<br>उपळाई रोड, श्रीकृष्ण कॉलनी, धान्य गोडावून मागे, बार्शी, जि. सोलापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.३१.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या भावाने चॅप्टर केसमध्ये खोटा जामीन दिला असून त्याबद्दल आपण दिलेल्या तक्रारीनुसार कारवाई केली जात नाही. तसेच या संदर्भात आपण केलेल्या अनेक अर्जांवर केलेल्या

चौकशीची माहितीही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दगडू पंढरीनाथ जाधव यांनी केली.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, जि. सोलापूर यांनी या संदर्भात लेखी खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी यांनी दि. १३.४.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. श्री. पाठक यांनी केलेल्या तक्रारीच्या चौकशीसाठी पोलिस निरीक्षक, बार्शी यांना कळविले होते. संबंधित प्रकरणाची चौकशी पूर्ण झालेली नसल्यामुळे माहिती देणे शक्य नव्हते, अपीलकर्त्यास तशी कल्पना होती. तथापि चौकशीची प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी यांनी पत्रव्यवहार केला होता. अपीलकर्त्यास त्याची कल्पना दिली होती, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांनी दि. ५.११.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या खुलाशात नमूद केले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी श्री. किरण काकडे व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी श्री. बी. आर. माळी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. 'चौकशी पूर्ण करून माहिती द्यावी,' अशी मागणी व मूळ विषयातील तक्रारीची शहानिशा करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र सन २००३ पासून मूळ प्रश्नात अपीलकर्ता तक्रार करीत असून सात वर्षे झाल्यानंतरही संबंधित प्रकरणाची चौकशी पूर्ण होत नाही, ही बाब गंभीर आहे, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. दगडू पंढरीनाथ जाधव यांच्या मूळ तक्रारीबाबतच्या चौकशीच्या कार्यवाहीबाबतची अद्ययावत माहिती पोलिस निरीक्षक, बार्शी व तहसीलदार, बार्शी यांनी अपीलकर्त्यास त्वरित देऊन दि. ३०.६.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

पुणे
दि. 28 MAY 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. बाळकृष्ण गजानन जोशी
एल.आय.जी. ३/४५, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,
लक्ष्मीनगर, पुणे-९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
म.ए.सो.चे आबासाहेब गरवारे कॉलेज,
कर्वे पथ, पुणे-४

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८१/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/०१/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३/०४/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महाविद्यालयातील कायमस्वरुपी कागदपत्रांच्या अनुषंगाने माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण गजानन जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 26 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिल अशोक सुतार
एस.टी.स्टँडसमोर,
विटा, ता.खानापूर,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद विटा,
ता.खानापूर, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पाणी पुरवठा विभाग नगरपरिषद विटा,
ता.खानापूर, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८१/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/१०/२००८, २८/११/२००८, |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/१२/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९/०१/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** विटा नगरपरिषदेच्या हद्दीतील अतिक्रमणांवरील कारवाई संदर्भात तसेच अतिक्रमणाबाबतच्या न्यायालयीन प्रकरणासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.५/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. सुनिल अशोक सुतार यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेली माहिती मुदतीत

देण्यात आलेली आहे. माहिती-मागणी अर्जातील मुद्दा क्र.१,२,४ व ५ अन्वये खुलासा व भाष्य देण्याची मागणी अपीलकर्त्याने केलेली असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याने देण्यात आलेली नाही,' असे जन माहिती अधिकारी, पाणी पुरवठा विभाग, नगरपरिषद विटा, श्री.राजेंद्र गौरीहर चिरमे यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. लक्ष्मण बाबूराव मडीवाळ
मु.खटाव, पो.ब्रम्हनाळ, ता.पलूस, **अपीलकर्ता**
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
सांगली पाटबंधारे मंडळ,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सांगली पाटबंधारे शाखा, माळवाडी विभाग,
भिलवडी, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८३/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९/०१/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०२/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९० ते २००७-०८ या कालावधीतील पाणी परवान्यासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगामार्फत आयोजित करण्यात आलेल्या दि.५/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. लक्ष्मण बाबूराव मडीवाळ हे अनुपस्थित होते. 'सर्व माहिती मिळाल्याने समाधान झाले असून कोणतीही तक्रार राहिलेली नाही. आपले अपील निकाली काढावे; असे निवेदन अपीलकर्त्याने दि.२/०५/२००९ च्या पत्रान्वये दिले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सांगली

पाटबंधारे शाखा, माळवाडी विभाग, भिलवडी, जि.सांगली यांनी अपीलकर्त्यांच्या पत्राच्या प्रतीसह प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 2 1 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. जगदीश रामचंद्र धारूरकर .. अपीलकर्ता
३२८२, कासारा घाट, नामदेव मंदिराजवळ, पंढरपूर
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य,
विद्युत वितरण कं. पंढरपूर शहर, उपविभाग, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. पंढरपूर शहर,
उपविभाग, पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ३१.३.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. जगदीश रामचंद्र धारूरकर
३२८२, कासारा घाट, नामदेव मंदिराजवळ, पंढरपूर
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य,
विद्युत वितरण कं. पंढरपूर शहर, उपविभाग, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. पंढरपूर शहर,
उपविभाग, पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.३१.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ हा खुल्या जागेला लागू नसताना आपल्या वडिलार्जित मालकीच्या जागेत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. पंढरपूर शहर, उपविभाग, पंढरपूर, जि. सोलापूर यांनी बेकायदेशीर विद्युत जोडणी दिली असून ही कार्यवाही चुकीची आहे व खुल्या जागेला हा कायदा लागू असल्याचे उत्तर ही माहिती चुकीची दिली आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. जगदीश रामचंद्र धारूरकर यांनी केले.

श्री. धारूरकर यांना वकिलांच्या कायदेशीर सल्ल्याच्या टिप्पणीसह मुद्देनिहाय उत्तर देण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. पंढरपूर शहर, उपविभाग, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. एच. जी. करंडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता कार्यवाही कायदेशीर की बेकायदेशीर असा या प्रकरणातील विषय आहे. त्याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ